# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०६/०७/२०१६.

**१) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—**

दिनांक ०५/०७/०१६ रोजी १७.३० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ४७९५ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत साकोली एनएच ६ रोड बसस्थानक जवळ भरधाव वेगाने व धोकादायकरित्या चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) पोटाच्या आजार असल्याने विहीरीमध्ये उडी घेवुन मृत्यु. :—**

दिनांक ०५/०७/०१६ रोजी ०५.३० ते १५.०० वा. दरम्यान रामसिंग रूपसिंग बैस वय २८ वर्ष, रा. अडयाळ याला पोटाचा आजार असल्याने तो सा.रु. भंडारा येथे औषधोपचार घेत असतांना सा.रु. भंडारा च्या इमारतीच्या मागील विहीरीमध्ये उडी घेवुन मरण पावला. असे फिर्यादी हिमंतसिंग रूपसिंग बैस वय ३३ वर्ष, रा. अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) किटक नाशक औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु. :—**

दिनांक ०५/०७/०१६ रोजी ०१.४५ वा. दरम्यानविजय चरणदास उके वय २५ वर्ष, रा. कारधा याने किटक नाशक औषध प्राशन केल्याने त्याला औषधोपचाराकरीता दिनांक ०४/०७/२०१६ ला २३.०० वा. प्रयास हॉसपिटल भंडारा येथे भरती केले होते. तो उपचारा दरम्यान मरण पावला. असे डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती २२ केसेस व इतर वाहनांवरती १०७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.